# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./२०८५/२०१८ दि. २६/०९/२०१८

## परिपत्रक

विषय :- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना व इतर शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/ईबीसी/९६२६, दिनांक २८/०८/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, शासन निर्णयानुसार राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना उच्च शिक्षण विभागासाठी लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी उच्च शिक्षण संचालनालया अंतर्गत येणाऱ्या शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान-विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठांतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळुन) व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणारे आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी सदर योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यापीठ स्तंरावर व मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षेखाली समिती स्थापन करण्यात आली असुन समितीमध्ये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव हे सदस्य आहेत. सर्व संलग्नित महाविद्यालयांना शिष्यवृत्ती संदर्भात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यास्तव सदर समितीशी संपर्क साधता येईल. महाविद्यालयांनी सुचना फलकावर शिष्यवृत्तीबाबत माहिती प्रसिध्द करून शिष्यवृत्ती योजनाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केल्यानुसार आवश्यक कार्यवाही आपल्यास्तरावर घ्यावी.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली